**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ०६.४०)**

**गुरुवार, दिनांक २७ जानेवारी २०२२**

**ठळक बातम्या**

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत आणि मध्य आशियायी देशांच्या परिषदेत दूरदृश्य प्रणालीद्वारे साधला संवाद.
- सुप्रसिद्ध लेखक आणि समाजसेवक डॉ. अनिल अवचट यांचं पुण्यात निधन.
- गडचिरोलीच्या इरपनार येथे नक्षलवादाला झुगारुन भयमुक्त प्रजासत्ताक दिन साजरा.
- विदर्भात आज आणि उद्या थंडीची लाट, नागपूर येथे सर्वात कमी 8 पुर्णांक 3 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद.

**आता ऐकूया बातम्या विस्तारानं...... मात्र त्याआधी एक आवाहन**

राज्यासह देशाच्या काही भागात कोरोना रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते आहे. कोरोनाच्या नवनव्या प्रकारांच्या बातम्या चिंता वाढवत आहेत. अशावेळी आम्ही श्रोत्यांना आवाहन करतो की, लवकरात लवकर पूर्ण लसीकरण करुन घ्या, तसंच १५ ते १८ या वयोगटातल्या मुलांसह इतर नागरिकांनाही लसीकरणासाठी प्रोत्साहित करा. यासोबतच कोरोना प्रतिबंधक नियम पाळा, गर्दी टाळा, मुखपट्टी अवश्य वापरा आणि हात वेळोवेळी स्वच्छ धुवा. चला...... त्वरा करा, लसीकरण अवश्य करुन घ्या.

कोरोनाशी संबंधित योग्य माहिती, मार्गदर्शन आणि मदतीसाठी राज्याच्या ०२० - २६१२७३९४ या मदत क्रमांकावर संपर्क साधा...

*******

**मध्य आशियायी परिषद**

पंतप्रधान  नरेंद्र मोदी आज भारत आणि मध्य आशियायी देशांमधल्या परिषदेत दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज सांगितले की, भारताच्या दृष्टीने एकात्मिक आणि स्थिर विस्तारित शेजारसाठी मध्य आशिया केंद्रस्थानी आहे. आभासी पद्धतिने आयोजित करण्यात आलेल्या या पहिल्या भारत-मध्य आशिया शिखर परिषदेच्या भाषणात, मोदी यांनी  प्रादेशिक सुरक्षेबद्दल समान चिंता आहे आणि अफगाणिस्तानातील घडामोडींबद्दल त्यांना काळजी असल्याच सांगितल, प्रादेशिक सुरक्षा आणि स्थैर्यासाठी हे परस्पर सहकार्य या संदर्भात अधिक महत्त्वाचे बनले आहे, यावरही  त्यांनी भर दिला. पहिल्यांदाच अशाप्रकारच्या परिषदेचं आयोजन करण्यात येतं आहे. कझाकस्तान, किरगिज प्रजासत्ताक, ताजिकिस्तान, तुर्कमेनिस्तान आणि उझबेकिस्तानचे राष्ट्रपती यात सहभागी  झाले  आहेत. २०१५ मध्ये पंतप्रधनांनी या देशांना भेट दिली होती. त्यानंतर द्विपक्षीय संबंधांमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा झाली आहे. या परिषदेत प्रादेशिक तसंच आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर चर्चा होण्याची शक्यता आहे.

**रेल्वे परिक्षा**

भारतीय रेल्वेनं आपल्या अतांत्रिक श्रेणी आणि केंद्रीय रोजगार अधिसूचनेची पहिली पायरी अर्थात संगणकावर आधारित चाचणी पुढे ढकलली आहे. या महिन्याच्या १४-१५ तारखेला रेल्वे भरती मंडळानं जारी केलेल्या अतांत्रिक श्रेणीच्या पहिल्या टप्प्यातल्या निकालासंदर्भात उमेदवारांनी उपस्थित केलेले प्रश्न आणि शंकांची चौकशी करण्यासाठी उच्चाधिकार समितीची स्थापना करण्यात आली आहे.

**ड्रोन प्रमाणीकरण**

ड्रोनचं प्रमाणीकरण सोपं, वेगवान आणि पारदर्शक करण्यासाठी सरकारनं ड्रोन प्रमाणपत्र योजना अधिसूचित केली आहे.  सुलभ ड्रोन नियम, हवाई क्षेत्राचा नकाशा, पी आय एल योजना आणि सिंगल विंडो डिजिटल स्काय प्लॅटफॉर्म यामुळे ही योजना भारतातल्या ड्रोन उद्योगाला सहाय्यकारी ठरेल  असं नागरी हवाई वाहतूक मंत्रालयानं आपल्या ट्विटर संदेशात म्हटलं आहे. 2030 पर्यंत भारताला जगाचं ड्रोन संकुल बनवण्याच्या दृष्टीनं हे आणखी एक पाउल आहे असंही

मंत्रालयानं म्हटलं आहे. वापरकर्त्यांना त्यांचे ड्रोन, चालक आणि मालक यांच्यासाठी एक वेळची नोंदणी पूर्ण करणं अत्यावश्यक आहे. यानुसार वापरकर्त्यांना पिवळ्या किंवा लाल क्षेत्रामध्ये जाण्याची इच्छा असेल तर प्रत्येक उड्डाणासाठी संकेतस्थळावरून परवानगी घेणं गरजेचं आहे.

**अनिल अवचट - निधन**

सुप्रसिद्ध लेखक आणि समाजसेवक डॉ. अनिल अवचट ह्यांचं आज सकाळी पुणे इथल्या राहत्या घरी दीर्घ आजारानं निधन झालं. ते ७७ वर्षांचे होते. त्यांनी मजूर, दलित, भटक्या जमाती, वेश्या अशा दुर्लक्षित घटकांच्या प्रश्नांविषयी विपुल लिखाण केलं आहे. डॉ. अनिल अवचट यांनी त्यांच्या दिवंगत पत्नी डॉ. अनिता अवचट यांच्यासोबत मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्राची स्थापना केली. इथे वापरली जाणारी व्यसनमुक्तीची अनोखी पद्धत ही जगभरातल्या अनेक व्यसनमुक्ती केंद्रांमध्ये वापरली जाते. आतापर्यंत त्यांची २२ पुस्तके प्रकाशित झाली असून राज्य आणि देशपातळीवरच्या अनेक पुरस्कारांनी गौरव करण्यात आला आहे. त्यांच्या पार्थिवावर आज दुपारी कोणत्याही धार्मिक विधीशिवाय अंतिम संस्कार करण्यात आले. डॉक्टर अनिल अवचट यांनी हजारो लोकांना व्यसनमुक्त करून समाजाला उपकृत केलं आहे. त्यांचं कार्य पुढे चालू ठेवणं , हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असं राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे. आज आपल्यातून सेवाव्रती सामाजिक कार्यकर्ता, मनस्वी साहित्यिक आणि हाडाचा पत्रकार असं बहुआयामी व्यक्तिमत्त्व निघून गेलं आहे, हे क्लेशदायक असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केली आहे. अवचटांचं चौफेर लेखन आणि सामाजिक कार्य हे पुढच्या कित्येक पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल असे आहे. त्यांचं हे योगदान महाराष्ट्र सदैव स्मरणात ठेवेल, असं मुख्यमंत्री म्हणाले. बहुआयामी जीवन समरसून जगणाऱ्या हरहुन्नरी डॉ. अनिल अवचट यांचं निधन ही महाराष्ट्राच्या सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक चळवळीची मोठी हानी आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी श्रध्दांजली वाहिली आहे.

**गडचिरोली**

गडचिरोली जिल्ह्यामधील भामरागड तालुक्यातल्या धोडराज पोलीस मदत केंद्राच्या हद्दीत असलेल्या कुचेर, इरपनार या ठिकाणी पंतप्रधान ग्राम सडक योजने अंतर्गत कुचेर आणि इरपनार दरम्यान रस्त्याचे बांधकाम युद्ध पातळीवर सुरू आहे. आदिवासी भागात रस्ते, पूल आणि इतर सुविधांची निर्मिती यास नक्षलवादी कायम विरोध करतात. त्यामुळे गेल्या 21 जानेवारी रोजी नक्षलवाद्यांनी कुचेर आणि इरपनार भागात जाऊन तेथे काम करणारे कंत्राटदार आणि माजुरांना मारहाण करून पिटाळून लावले. तसेच रस्ता निर्मितीच्या कामात असलेली वाहने पेटवून टाकली. यामध्ये 9 ट्रॅक्टर, दोन जेसीबी, ग्रेडर इत्यादी अवजड वाहनांचा समावेश होता. नक्षलवाद्यांनी वाहनांची जाळपोळ केल्यानंतर या भागात बॅनर लावून विकास कामांना मज्जाव केला होता. त्यामुळे या परिसरात दहशतीचे वातावरण होते.पण गावक-यांनी भयमुक्त होऊन याठीकाणी प्रजासत्ताक दिन साजरा केला.

**विदर्भ करोना**

राज्यात काल ओमायक्रॉन संसर्ग झालेला एकही नवा रुग्ण आढळला नाही. **नागपूरा**त आज 2,027 नवे कोरोना बाधित आढळले असून 3,118 जण बरे झाले आहेत.तर आज 10 जणांचा मृत्यु झाला आहे. **चंद्रपूर** जिल्ह्यात आज 563 जणांनी कोरोनावर मात केली असून 438 नवीन रुग्ण बाधीत झाले आहे. तर आज एका बाधिताचा मृत्यू झाला आहे.**भंडारा** जिल्ह्यात 191 कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण आढळले असून बरे झालेल्या रुग्णांची संख्या 409 आहे. **बुलढाणा** जिल्ह्यात आज 243 रुग्ण आढळले,

**लकी ड्रा योजना भाग- २**

चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे राबविण्यात येणा-या कोविड लसीकरणाला प्रोत्साहन देण्यासाठी दि. १२ नोव्हेंबर ते २० डिसेंबर २०२१ दरम्यान घेण्यात आलेल्या बंपर लकी ड्रॉ उपक्रमाला मोठा प्रतिसाद लाभल्यानंतर आता लसीकरण करणाऱ्यांना बक्षीस जिंकण्याची पुन्हा संधी मिळणार आहे. बंपर लकी ड्रॉ योजना भाग- २ ची घोषणा महापौर राखी संजय कंचर्लावार यांनी केली. २८ जानेवारी ते १५

फेब्रुवारीदरम्यान लसीकरण करणाऱ्या सर्व पात्र वयोगटातील व्यक्तींना या योजनेत सहभागी होता येणार आहे.

**नियमीतीकरण**

पुर्व नागपूरमधील वाठोडा येथील  धरती माँ लोककल्याण सोसायटी येथील रहिवाशी नागरिकांच्या नियमितीकरणासंदर्भात नागपूर सुधार प्रन्यासद्वारे पारित करण्यात आलेल्या ठरावाच्या अनुषंगाने भूखंडधारकांच्या नियमितीकरणासंदर्भात सकारात्मक निर्णय घ्या, असे निर्देश महापौर दयाशंकर तिवारी यांनी नासुप्र अधिका-यांना दिले.

**स्मशानभूमी**

अमरावती, वर्धा आणि नागपूर जिल्ह्याच्या सीमेवर वर्धा नदीच्या तीरावर अमरावती जिल्ह्यातील हातुर्णा हे शेवटचे गाव आहे. पूर्वी या गावातील स्मशानभूमी वर्धा नदीपात्रात होती. दोन दशकांपूर्वी वर्धा नदीवर अप्पर वर्धा धरणाची निर्मिती झाल्यानंतर नदीच्या तीरावर दोन ते तीन एकर जागेवर माजी आमदार नरेशचंद्र ठाकरे यांच्या संकल्पेतुन या स्मशानभूमीची पायाभरणी करण्यात  आली असून वर्धा नदीला बाराही महिने मुबलक पाणी असते. त्यामुळे हिरव्यागार झाडांनी ही स्मशानभूमी बहरली आहे.

**तिवसा केंद्र**

तिवसा येथे महिला आर्थिक विकास महामंडळ व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र आणि सक्षम लोकसंचालित साधन केंद्रातर्फे रेडिमेड गारमेंट व एलईडी लाईटनिर्मिती व प्रशिक्षण केंद्राचे उदघाटन  अमरावती जिल्ह्याच्या पालकमंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांच्या हस्ते आज झाले . या केंद्रासाठी आवश्यक मोठी जागा मिळवून देऊ असे आश्वासन   ठाकूर यांनी यावेळी दिले. . या उपक्रमातून अनेक महिलांना प्रशिक्षणाबरोबरच उद्यमशीलतेचाही विकास व्हायला मदत होईल. तिवसा येथे केंद्रासाठी आवश्यक मोठी जागा मिळवून देऊ, तसेच नांदगावपेठेतही युनिट उभारण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

**प्रशिक्षण केंद्र**

जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जग उद्धारी" ही म्हण आता कालबाह्य झाली आहे. आता "जिच्या हाती आर्थिक व्यवहार, ती कुटुंबाचा आधार" ही संकल्पना समाजात रूजविण्यासाठी महिलांना स्वतःच्या पायावर उभे करणे गरजेचे आहे. त्यासाठी जिल्हयाचा पालकमंत्री म्हणून आपण कटिबद्ध आहोत. पुढील एक - दोन वर्षात जवळपास 10 हजार महिलांना प्रशिक्षणातून रोजगार उपलब्ध करून देवून खऱ्या अर्थाने महिलांचे सक्षमीकरण करण्यात येईल, अशी ग्वाही मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री तथा जिल्हयाचे पालकमंत्री विजय वड़ेट्टीवार यांनी दिली. सावली येथील राष्ट्रपिता महात्मा गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात महिला आर्थिक विकास महामंडळ व लोकर संशोधन केंद्र, मुंबई यांच्या वतीने आयोजित कार्पेट निर्मिती व प्रशिक्षण केंद्राचे उद्घघाटन करतांना ते बोलत होते. मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी गुल्हाने म्हणाले, महिला सक्षमीकरणाची सुरुवात खऱ्या अर्थाने या प्रकल्पाच्या माध्यमातून सुरू झाली आहे. सुरुवातीला 800 महिलांना रोजगार देण्यात येणार असला तरी, ब्रह्मपुरी, सिंदेवाही व सावली येथील महिलांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. या प्रकल्पाचा महिलांना फायदा होईल तसेच कुटुंबाला आधार मिळेल, असे त्यांनी सांगितले.

**हवामान**

नागपूरच्या प्रादेशिक हवामान खात्याने वर्तविलेल्या अंदाजानुसार विदर्भातील तुरळक ठिकाणी आज आणि उद्या थंडीची लाट असणार आहे. आज विदर्भात सर्वात कमी तापमान नागपूर येथे 8. पुर्णांक 3 अंश सेल्सिअस नोंदवण्यात आल असून, गोंदिया बुलढाणा येथे 8 पुर्णांक 8, तर वर्धा येथे 9 पुर्णांक 4 आणि अकोला येथे 9 पुर्णांक 3 अंश सेल्सिअस तापमान नोंदविण्यात आल आहे.

*******